FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि, पहिली खबर क्र. ३१/२०१८ वर्ष ..., दिनांक २८/०९/१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. १९८८ कलमे Sections ७, १२
(ii) अधिनियम Act (सुधारणा २०१८), कलमे Sections ...
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार शुक्रवार, तारीख पासून २८.०९.१८, वेळ १२.०० वा, तारीख पर्यंत २८/०९/१८ वेळ २२.४० वा.
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख २८/०९/२०१८ वेळ १५:४५ वा
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. .../२०१८, तारीख २८/०९/२०१८ वेळ ०८:०० वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव सांताक्रूझ, पो. ठाणे, मुंबई ठिकाणाचे नंबर ..., गल्ली ..., रस्त्याचे नाव ...
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..., गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name सुजीत पांडे (b) वडीलाचे / पतीचे नाव महेंद्र पांडे
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय २८ वर्षे, १८/०३/१९९० (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ८८३८२३०८१८
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ... दिल्याचा दिनांक ... दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय वाहन चालक
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ब्राम्हण, जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता : ... गल्ली / सर्वे नं. २८ घर / नाव नंबर २३ कामराज नगर, फोन /मो. नंबर वसंतराव नाईक मार्ग, पॅन नं. ... वोटर्स नं. ...
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव घाटकोपर (पू), मुंबई जवळचे प्रसिद्ध ठिकाण ४०००७७, गाव अरियानी पोस्ट अरियानी पो. स्टे. सरीयानी
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका मेहनगर जिल्हा आजमगड राज्य उत्तरप्रदेश, सध्याचा पत्ता ...
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१) दिलीप तुकाराम पवार वय ३२ वर्षे, धंदा - नोकरी, परिवेक्षाधिन पोलीस उप निरीक्षक, रा. ठि. २/सी, रुम नं. ११०२, सांताक्रुझ पोलीस वसाहत, मुंबई (मा. पत्ता) - मु. पो. शिवाजी नगर, मंडा दुधनी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.
२) आलोसे सर्जेराव आत्माराम फुगळे, वय ३५ वर्षे, धंदा - नोकरी, पोलीस शिपाई क्र. ०८०२७५, रा. ठि. रुम नं. ४, बि. नं. १४/५, नवीन पोलीस वसाहत, एस. एल. रहेजा हॉस्पिटल रोड, माहिम (प). मु. १६.

Scanned by CamScanner

यातील फिर्यादी नामे श्री. सुजीत महेंद्र पांडे, वय २८ वर्षे यांचा स्वतंत्र पानावर घेतलेला संगणकीय जबाब हाच प्रथम खबरी म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

(जगदिश चंदु वळवी)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

Scanned by CamScanner

465

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ............ निरंक
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.......... — ..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ............ —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ............ —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी श्री. दिलीप तुकाराम पवार पो. उप. नि. व श्री सर्जेराव आत्माराम पंगळे, पो. शि. क्र. ०८०२७५) यांनी फिर्यादी यांचे मोटर कारचे झाले किरकोळ अपघाताच्या सांताक्रुझ पो. ठाणेत नोंद झालेल्या नोंदीची इन्शुरन्स करीता छायांकित प्रत साक्षांकित करुन देण्याकरीता रु. ५०००/- ची लाचेची मागणी केली. फि. यांनी रोख स्वरुपात देण्यास असमर्थता दर्शविली असता आरोपी यांनी प्रत देण्याच्या मोबदल्यात रु. २०००/- किमतीची पेपरची १ रिम व १०००/- रुपयांचे पोलीस ठाण्यात दैनंदिन वापरात

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्री. जगदीश चंद्र वळवी पो. नि., लाप्रवि, मुंबई. येणाऱ्या कागदपत्रांचे झेरॉक्स प्रती असे एकुण ३०००/- रु. किंमतीच्या वस्तु कायदेशीर परिश्रमा शिवाय पारितोषण म्हणून स्विकारल्या म्हणून कलम ७,१२, भ्र.प्र. अधि १९८८ (सुधारणा २०१८) अन्वये गुन्हा नोंद.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... जगदीश चंद्र वळवी
पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner

—फिर्याद— दिनांक— २७/०९/२०१९

श्री.सुजीत महेंद्र पांडे, वय—२८ वर्षे, धंदा— मोटार वाहन चालक, रा.ठि. खोली नं. २७, कामराज नगर, व्ही.आर.एन, मार्ग, घाटकोपर पश्चिम मुंबई— ४०० ०७७. मो. क्र.७७३८२३०८१८.

मी वरील प्रमाणे असून नमुद पत्यावर गेल्या २० वर्षापासून माझी मावशी नामे श्रीमती मधुबाला पांडे व काका श्री राजेश पांडे यांचेकडे रहावयास आहे. माझे आईवडिल व पत्नी ही माझे मुळ गांवी ग्राम पोष्ट खरीहानी, तालुका मेहनगर, जिल्हा आझमगड, राज्य उत्तरप्रदेश येथे रहावयास आहेत. मी श्री राजेश गुप्ता यांची टुरीस्ट हुंडाई एक्सेंट मोटार कार क्रमांक एमएच—०५—बीजे—२९०८ ही चालवित असतो. त्यातून मिळणारे उत्पन्नावर माझा व माझे कुटुंबियाचा उदरनिर्वाह करीत असतो.

दिनांक २७/०९/२०१९ रोजी पहाटे ०२.०० वा. चे दरम्यान मी माझे ताब्यातील टुरीस्ट हुंडाई एक्सेंट मोटार कार क्रमांक एमएच—०५—बीजे—२९०८ ही जे. डब्लू मॅरीएट हॉटेल जुहु या ठिकाणाहून फिनीक्स मॉल, लोअर परेल या ठिकाणी जात असतांना अचानक जुहुच्या टर्नीग पाईंट जवळ, बोरा बोरा हॉटेल समोर मोटार कारचा एक्सेल तुटल्याने माझी कार ही रस्त्याचे दुभाजकाला धडकून अपघात झाला. सदरवेळी गाडीचे बंम्पर, रेडीएटर, मडगार्ड व इतर गाडीच्या भागाचे नुकसान झाले म्हणून मी सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे मोटार कारचे अपघात होवून नुकसान झाले बाबत माहिती देण्याबाबत गेलो. त्यावेळी रात्रपाळीचे ठाणे अंमलदार यांनी माझे तक्रारीची किरकोळ अपघात नोंदवहीत नोंद घेतली. सदरवेळी सांताक्रुझ पोलीस ठाणेचे ठाणे अंमलदार यांना मी किरकोळ अपघात नोंदवहीची सांक्षाकित प्रतीची इंन्शुरंन्सकामी मागणी केली असता त्यांनी मला, रात्र असल्यामुळे झेरॉक्स दुकाने बंद असून, सकाळी पोलीस ठाणेस येवून सांक्षाकीत प्रत घेवून जाण्यास सांगितले.

त्यानंतर दुपारी १२.०० वा. चे दरम्यान सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे किरकोळ अपघाताची सांक्षांकित प्रत घेण्याकरीता गेलो असता, ठाणे अंमलदार पोलीस उप—निरीक्षक दिलीप तुकाराम पवार यांनी माझेकडे रूपये ५००/— ची लाचेची मागणी केली. त्यावेळी माझेकडे एवढे पैसे नाहीत असे मी पोलीस उप—निरीक्षक पवार यांना सांगितले. त्यावर पवार साहेबांनी 'तुझे मालकाला घेवून ये' असे सांगितले. मला पवार साहेबांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय वरळी मुंबई येथे दुरध्वनी वर संपर्क साधून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी मुंबई येथे आलो. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी येथे इंग्रजीमध्ये सांताक्रुझ पोलीस ठाणेचे पोलीस उप—निरीक्षक पवार यांचेविरोधात लेखी तक्रार दिली. सदरवेळी पोलीस निरीक्षक वळवी यांनी मला वरिष्ठांसमोर उभे केले. वरिष्ठांनी माझे तक्रारीची खातरजमा करण्याकरीता पोलीस निरीक्षक वळवी व सहाय्यक पोलीस आयुक्त माने यांचे पथक नेमूण पुढील कारवाई करण्याबाबत आदेश दिले. पोलीस निरीक्षक वळवी यांनी गोपनीय कक्षात माझे व पंचाचे तसेच स्वत:चे दोन पंचासमक्ष वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि. वळवी यांनी मला दिलेल्या सुचनेनंतर पडताळणीत माझे शर्टाचे आतील बाजूस बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असलेबाबत तसेच माझे व लोकसेवक यांच्यात होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रित

Scanned by CamScanner

करण्यात येणार असल्याचे सांगितले. सदर पडताळणीमध्ये लोकसेवक पोलीस उप–निरीक्षक पवार यांनी लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्यास त्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

दिनांक २७/०९/२०१९ रोजी मी पो.नि.वळवी, सहायक पोलीस आयुक्त माने व पथक असे लाप्रवि. कार्यालयातून पोलीस वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालयात पडताळणी करण्याकरीता रवाना झालो. मी, पंच व पोलीस पथक एस.व्ही. रोड सांताक्रुझ पश्चिम मुंबई येथे जावून पोलीस वाहन थांबवून पो.नि. वळवी यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावून तो चालू करुन लोकसेवकाची भेट घेण्याकामी मला व पंच विवेक त्रिभुवन यांच्यासोबत पाठविण्यात आले.

साधारण १८.५५ वा चे सुमारास मी व पंच विवेक त्रिभुवन असे लोकसेवक श्री. पवार यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालय सांताक्रुझ पोलीस ठाणे मुंबई येथे गेलो. पोलीस उप–निरीक्षक पवार यांना मी माझे कारचे किरकोळ अपघाताची साक्षांकित प्रतीची मागणी केली असता लोकसेवक पवार यांनी लाचेच्या स्वरूपात माझेकडे पेपरची एक रिम व पोलीस ठाणे दैनंदिन वापरासाठी कागदपत्रे, स्टेशनरीचे झेरॉक्ससाठी लागणारे कागदपत्राची झेरॉक्स करण्यास सांगून वस्तुच्या स्वरूपात लाचेची मागणी केली. सदरवेळी प्रथम चौकशी पथकातील पोलीस अंमलदार सर्जेराव पुंगळे यांनी पोलीस ठाणेमध्ये दैनंदिन वापरासाठी लागणारे कागदपत्र (अकस्मात मृत्यू, हरविलेल्या वस्तूचे प्रमाणपत्र इ.) रू. १७०/– च्या झेरॉक्स प्रती झेरॉक्स दुकानात जावून काढून घेतल्या. व सदर झेरॉक्स प्रतीचे बिल मला देण्यास सांगितले त्यानुसार सदरचे बिलाची रक्कम मी दिली.

त्यानंतर मी माझे बरोबर आलेल्या पंचासह पोलीस वाहन थांबलेल्या ठिकाणी येवून वरील प्रमाणे हकीकत पो.नि. वळवी व सहायक पोलीस आयुक्त माने यांना सांगितली. त्यानुसार वळवी साहेब व माने साहेब यांनी पडताळणी दरम्यान आमच्यात झालेले संभाषण ऐकून श्री पवार यांनी वस्तु स्वरूपात लाचेची मागणी केल्याची खात्री केली. त्यावेळी मी दुकानात जावून रूपये २००/– किंमतीची एक रिम पेपर विकत आणले. सदर पेपर रिमवर पोलीस वाहनावरील पोलीस अंमलदार चालक जामसंडेकर यांनी पंचासमक्ष अॅन्थ्रेसिनची पावडर कापसाच्या बोळयाने लावून पेपर रिम एका प्लॅस्टीकच्या पिशवीत ठेवून सदरची पिशवी माझेकडे दिली. तसेच पोलीस निरीक्षक वळवी साहेब यांनी मला सापळा कार्यवाही संदर्भात सुचना दिल्या. त्याचप्रमाणे लोकसेवक पवार अथवा त्याच्या वतीने कोणी इसमाने पेपर रिम स्विकारल्यास डोक्यावरून उजवा हात फिरवून सापळा पथकास इशारा देण्याबाबत मला सूचना केली. सदर सुचना दिल्यानंतर पो.नि. वळवी यांनी मला व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री.विवेक त्रिभुवन यांचेसोबत लोकसेवक पोलीस उप–निरीक्षक पवार यांना भेटण्यासाठी ठरल्याप्रमाणे सांताक्रुंझ पोलीस ठाणे येथे पाठविले.

मी सांताक्रुंझ पोलीस ठाणे येथे आलो असता पोलीस उप–निरीक्षक पवार यांचेशी माझी किरकोळ अपघात नोंदीची साक्षांकित प्रती देण्याबाबत पुन्हा चर्चा झाली. त्यावेळी पोलीस उप–निरीक्षक पवार यांनी वस्तुच्या स्वरूपात लाच म्हणून एक रिम पेपरची मागणी केली. म्हणून मी प्लॅस्टीकच्या पिशवीत ठेवलेली एक पेपरची रिम पोलीस उप–निरीक्षक पवार यांना काढून दिली. असता त्यांनी ती पेपरची रिम स्विकारली. त्यावेळी मला दिलेल्या सुचनेप्रमाणे इशारा केला असता पोलीस उप–निरीक्षक पवार यांना

Scanned by CamScanner

कागदाची रिम स्वीकारताना सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी रंगेहाथ पकडले.

तरी दिनांक २७/०९/२०१९ रोजी केलेल्या पडताळणीत लोकसेवक श्री.पवार यांनी किरकोळ अपघात नोंदीच्या साक्षांकित प्रत देण्याच्या मोबदल्यात वस्तुच्या स्वरूपात लाचेची मागणी केली व ती स्विकारली. त्याप्रमाणे सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक पोलीस उप–निरीक्षक पवार यांना एक पेपरची रिम स्विकारताना रंगेहाथ पकडले. म्हणून माझी पोलीस उप–निरीक्षक दिलीप तुकाराम पवार व त्यांच्या वतीने पोलीस ठाण्यात दैनंदिन कामासाठी लागणाऱ्या स्टेशनरीचे झेरॉक्स काढून देण्यास व पेपर रिमची मागणी करणारे पोलीस अंमलदार सर्जेराव आसाराम पुंगळे याचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( जगदीश वळवी )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

28.09.19

Scanned by CamScanner